**प्रेसनोट** **दि.१५/०३/२०१९**

## भारती विद्यापीठ पो स्टे पुणे शहर

## विद्यार्थीनीचा हरविलेला मोबाईला मिळवुन दिलेबाबतची उल्लेखनीय कामगिरी

कु. पुनम मोरे,रा.कराड,जि.सातारा ही विद्यार्थीनी पुण्यातील भारती विद्यापीठ येथे इंजिनिअरीगचे तृतीय वर्षास शिकण्यास असुन ती दि. १४/०३/२०१९ रोजी स्वारगेट येथुन भारती विद्यापीठ कॉलेज येथे आली असता, कॅबमधुन उतरल्यानंतर काही वेळाने तिचा अप्पो कंपनीचा फोन ओला कॅबमध्ये विससली असल्याचे लक्षात आले.

सदर मुलगी कु. पुमन ही सकाळी ११:०० वाजणेच्या सुमारास भारती विद्यापीठ पोलीस ठाणेस येऊन मोबाईल ओला कॅबमध्ये राहिल्याचे सांगुन मदत मागितली. इकडील पोलीस ठाणेस नेमणुकीस असलेले पोशि ८२९८ रत्नपारखी, पोशि ८७५१ खाडे यांनी तिचेकडुन ओला कॅब बुक करतेवेळीची योग्य ती माहिती घेऊन ओला कॅब कंपनी व त्यांचेकडील कॉन्टॅक्ट वापरुन सदर ओला कॅब चालकाशी संपर्क क्रमांक साधला. त्यास कु. पुनम  हिचा अप्पो फोन आपल्या कॅबमध्ये विसारल्याचे सांगितले. सदर कॅब चालकाने तात्परता दाखवत विद्यार्थीनीचा फोन पोलीस ठाणेस आणुन सुस्थितीत तिचे ताब्यात दिला.

कु. पुनम मोरे हिने अप्पो मोबाईल शोधण्याकरीता मदत मागितली असता, त्याप्रमाणे पोशि ८२९८ रत्नपारखी, पोशि ८७५१ खाड यांनी ओला कॅब कंपनी व त्यांचेकडील कॉन्टॅक्ट वापरुन तिचा अप्पो हा मोबाईल मिळवुन दिल्याबाबत तसेच पोलीसांनी दाखविलेल्या तत्परतेबाबत खुपच भारावल्याचे तिने सांगुन नमुद पोलीस कर्मचाऱ्याचे व पुणे शहर पोलीस दलाचे आभार मानले

(विष्णु शं. पवार)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे शहर